खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

## अर्थशास्त्र विभाग

### शैक्षणिक वर्ष 2024 – 2025 मधील उपक्रम अहवाल

शैक्षणिक वर्ष 2024 – 2025 मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. त्या सर्व उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

द्वितीय वर्ष अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ आयोजित २२ ऑगस्ट २०२४ करण्यात आले याप्रसंगी टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षात अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबचे पुष्प देऊन केले. शैक्षणिक वर्षामध्ये अर्थशास्त्र विभाग अंतर्गत विविध तज्ञांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. तसेच अर्थशास्र विभागामार्फत प्रत्येक वर्षी अर्थपर्व वार्षिक अंकाचे प्रकाशन केले जाते. या वर्षाचे अर्थपर्व – 7 चे प्रकाशन दि. १९/१०/२०२४ रोजी मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते करण्यात आले होते. एम. ए. अर्थशास्त्र आणि टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील अध्ययवत माहिती प्रात्यक्षिक स्वरूपात मिळावी या हेतूसाठी राजगुरुनगर सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




त्याचप्रमाणे अर्थशास्त्र विभागामध्ये Economic Forum ची स्थापना गेल्या अनेक वर्षापासून झालेली आहे. त्यात प्रत्येक महिन्याच्या शनिवारी विद्यार्थ्यांना विविध संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्याची

संधी दिली जाते. याप्रसंगी विद्यार्थी अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडींचा मागोवा घेतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठावरून आपले विचार मांडण्याची संधी मिळते.




दि.११/०२/२०२५ रोजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव या ठिकाणी केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ -२०२६ कार्यशाळेस टी.वाय.बी.ए. आणि एम.ए. वर्गातील एकूण ९ विद्यार्थी उपस्थित होते.

विविध उपक्रमांबरोबरच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन दि. ०८/०३/२०२५ करण्यात आले होते. या स्पर्धेत एस. वाय व टी.वाय.बी.ए मधील विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. त्यातील कविता वाचन,विषय व सादरीकरण विचारात घेऊन तीन क्रमांक काढण्यात आले. सदर स्पर्धेच्या निमित्ताने अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणा-या महिला प्राध्यापक प्रा. एस. व्ही. धानापुणे, प्रा. वर्षा वाळुंज यांचा सत्कार करून बक्षीस वितरण करण्यात आले.



दि.०४/०४/२०२५ रोजी महिन्यात टी वाय बी ए आणि एम ए द्वितीय वर्ष या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सदिच्छा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. शिरीष पिंगळे सर उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे देखील उपस्थित होते त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारे प्रा. एस. व्ही. धानापुने, डॉ. बी. ए. वायकर, प्रा. व्ही. एस. वाळुंज उपस्थित होते.

